**महानिर्मिती कंपनीच्या भुसावळ जि. जळगांव येथे १*६६० मे.वॅ.क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युत बदली प्रकल्पाच्या उभारणीस व त्याकरीता लागणाऱ्या भागभांडवलास मंजूरी देणे व वितरणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र. निधिवि-२०२१/प्र. क्र.६३/ऊर्जा-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, -४०० ०३२.
दिनांक :- ०८ फेब्रुवारी,२०२१

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/ऊर्जा-४, दि.५.१०.२०१०
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दि. १६.०४.२०२०
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/ अर्थ-३, दि. ०४.०५.२०२०
४) महानिर्मितीचे पत्र क्र. CMD/MSPGCL/GOM/No.०७८२, दि. १३.११.२०२०
५) वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ८१२/२०२१

<u>प्रस्तावना :-</u>

महानिर्मिती कंपनीच्या भुसावळ जिल्हा जळगाव येथे १*६६० मे.वॅ. क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपर क्रिटीकल औष्णिक विद्युत प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयान्वये भुसावळ औष्णिक बदली प्रकल्पाच्या उभारणीसाठी रु. ४२९० कोटीस मान्यता दिली आहे. सदर रकमेपैकी शासनाचे २०% भागभांडवल रु.८५८ कोटी इतके मंजूर केले आहे. त्यापैकी आजतागायत दि.१४/०३/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ५.७० कोटी दि. १६/०८/२०११ च्या शासन निर्णयान्वये रु. ६० लाख दि. ०४/०२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये रु.८ लाख दि. ३०/०३/२०१२ च्या शासन निर्णयान्वये रु. २३ लाख दि. ३०/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु. ३५.२० लाख दि. ३१/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये रु. ३७ कोटी दि. ०१/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. ३०.२४ कोटी दि. २७/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. १२.९६ कोटी दि. ०९/१०/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. ३१.९५ कोटी दि. ३१/०३/२०२० च्या शासन निर्णयान्वये रु. ३२.०५ कोटी अशी एकूण रु.१५०.५५ कोटी भागभांडवल महानिर्मिती कंपनीस वितरीत करण्यात आले आहे.

महानिर्मिती कंपनीचा सदर प्रकल्पासाठी एप्रिल, २०२० ते दि. ३१/१२/२०२० पर्यंत रु. ६५०.४६ कोटी इतका खर्च झालेला आहे.तसेच सदर खर्चा पैकी शासनाच्या भाग भांडवलाचा हिस्सा २० टक्केप्रमाणे रु. १३०.१ कोटी आहे.महानिर्मिती कडून प्राप्त झालेल्या संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये सुधारित प्रपत्रानुसार शासनाचे भागभांडवल रु. १३०.१० कोटी महानिर्मिती कंपनीस वितरीत करावयाचे आहे. तथापि कोविड या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ मधे वित्त विभागाने वित्तिय उपाययोजना म्हणून कमी निधी उपलब्ध केला आहे. वित्त विभागाने आपल्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८१२/२०२१/सचिव (व्यय) अन्वये रु. २० कोटी शासनाचे भागभांडवल म्हणून वितरणास उपलब्ध केले आहेत. सबब महानिर्मिती कंपनीस भुसावळ जि. जळगांव येथे १*६६०मे.वॅ. क्षमतेच्या कोळशावर

आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या उभारणीसाठी रु. २० कोटी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील प्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महानिर्मिती कंपनीस भुसावळ जि. जळगांव येथे १*६६०मे.वॅ. क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युतप्रकल्पाच्या उभारणीसाठी महानिर्मिती कंपनीस सदर प्रकल्पासाठी एप्रिल, २०२० ते दि. ३१/१२/२०२० पर्यंत रु. ६५०.४६ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर झालेल्या खर्चाच्या २०% भागभांडवलाची रक्कम रु. १३०.१० कोटी आहे. सदर भाग भांडवलाच्या रकमेपैकी राज्य शासनाचेभागभांडवल रु.२०,००,००,०००/- (अक्षरी रु. वीस कोटी फक्त) इतकी रक्कम अदा करण्याबाबत खालील प्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | रक्कम (रु) | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|
| १ | महानिर्मिती कंपनीस भुसावळ जि. जळगांव येथे १*६६० मे.वॅ.क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युतप्रकल्पाच्या उभारणीसाठी भाग भांडवल निधी मंजूर करणेबाबत. | २०,००,००,०००/- | ४८०१४०८६ |
| एकूण | | २०,००,००,०००/- | - |

२. महानिर्मिती कंपनीस भुसावळ जि. जळगांव येथे १*६६०मे.वॅ. क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युतप्रकल्पाच्या उभारणीसाठी महानिर्मिती कंपनीस सदर प्रकल्पासाठी एप्रिल, २०२० ते दि. ३१/१२/२०२० पर्यंत रु.१३०.१ कोटी इतक्या शासनाच्या भाग भांडवलानुसार केलेल्या खर्चापैकी अंशत: प्रतीपूर्ती करण्यासाठी रु.२०,००,००,०००/- (अक्षरी रु. वीस कोटी फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. वरील प्रयोजनासाठी होणारा खर्च "मागणी क्र.के-११ मुख्यलेखाशीर्ष ४८०१, महानिर्मितीमध्ये शासनाची गुंतवणूक सर्वसाधारण लेखाशीर्ष ४८०१४०८६" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी मुंबई यांचेमार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) आणि नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत-. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांना मंजूर झालेली रक्कम रु. ५० कोटी (रुपये पन्नास कोटी फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरित करुन महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांचे नावे स्वतंत्ररित्या धानादेश काढून वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. हा शासन निर्णय शासन निर्णय क्र. वित्त विभागाने आपल्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८१२/२०२१/सचिव (व्यय) अन्वये रु. २० कोटी शासनाचे भागभांडवल म्हणून वितरणास दिनांक २२/०१/२०२१ च्या टिपणीन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि. १६ एप्रिल, २०१६ च्या महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२० च्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०२०/प्र.क्र.६४/अर्थ-३ च्या परिपत्रकातील परिच्छेद ३ खालील नमूद केलेल्या अनुक्रमांक १ ते ९ मधील तपासणी सूचितील अट क्र. (२) (३) व (९) या अटींची पूर्तता होत असून इतर अटी लागू नसल्याची प्रमाणित करण्यात येत आहे तसेच वित्त विभागाच्या दिनांक ४ मे २०२० च्या शासन निर्णयातील लागू असलेल्या सर्व अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

७. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षीप्त देयक प्रलंवित नाही तसेच उपयोगिता प्रमाण पत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १५११/१४६१ दिनांक. ०९/१२/२०२० अन्वये तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ८१२/२०२१/सचिव (व्यय) दिनांक. २२/०१/२०२१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२१०२०८१३०२१०६२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shraddha Deven Kocharekar

Digitally signed by Shraddha Deven Kocharekar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industries Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef70683916299eab51c867c5a13147d142a80, cn=Shraddha Deven Kocharekar
Date: 2021.02.08 13:08:59 +05'30'

**( श्रध्दा कोचरेकर )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत :-**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई
३. सचिव, महाराष्ट विद्युत नियामक आयोग, वर्ल्डट्रेड सेंटर नं. १, १३मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
४. मा. विरोधीपक्षनेता विधानसभा / विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ, मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
८. अधिदान व लेखाअधिकारी, अराप / रालेवि-१, मुंबई.
९. अधिदान व लेखाअधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१०. निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
११. अवर सचिव, (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. कक्ष अधिकरी (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. विशेष कार्य अधिकारी (ऊर्जा-४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. वित्तविभाग, (अर्थसंकल्प-३ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१५. निवडनस्ती (ऊर्जा-४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.